# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

## मराठी विभाग

लोकमत

# विद्यार्थ्यांनो, पुस्तकांशी मैत्री करा : वाघिरे

## हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात मराठी राजभाषा दिन उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** विद्यार्थ्यांचे अभ्यासक्षेत्र कोणतेही असले, तरी सकारात्मकता, कल्पनाशक्ती, सर्जनशीलता आणि मानवी मूल्ये समृद्धपणे अनुभवण्यासाठी पुस्तकांशी मैत्री करण्याचे आवाहन कवी व पिंपरीच्या महात्मा फुले महाविद्यालयातील प्रा. विद्यासागर वाघिरे यांनी केले.

ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात मराठी विभाग व मराठी वाङ्मय मंडळ यांच्या वतीने जागतिक मराठी राजभाषा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. किशोर लांडेपाटील, प्रा. दिलीप मुळूक, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. शंकर गोपाळे उपस्थित होते.



आयोजित कार्यक्रमात बोलताना प्रा. विद्यासागर वाघिरे.

वाघिरे म्हणाले, की मराठी भाषेची परंपरा प्राचीन असून गाथासप्तपदी ग्रंथ, ताम्रपट, शिलालेखापासून तिचा प्रवास सुरु झाल्याचे सांगता येते. ज्ञानेश्वरी आणि गाथा महाराष्ट्राचा सांस्कृतिक ऐवज असून प्रत्येकाने एक तरी ओवी अनुभवायला हवी, असेही ते म्हणाले. पुस्तक वाचून मिळणारा आनंद सांगताना त्यांनी शंकर पाटील आणि व्यंकटेश माडगूळकर यांच्या ग्रामीण कथांचे थेट हृदयाला जाऊन भिडणारी वर्णने विद्यार्थ्यांना ऐकवली.

प्रास्ताविकात बोलताना उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी वाचनसंस्कृतीच्या प्रसारासाठी प्रत्येक सूज्ञ मराठी भाषकाने प्रयत्न करायला हवेत, असे सांगून मराठी भाषा फक्त अभिमानासाठी न राहता, ज्ञानभाषा होण्यासाठी सरकार दरबारी प्रयत्न व्हायला हवेत, असे सांगितले.

मराठी विभागाच्या वतीने कुसुमाग्रज यांच्या कवितांचा जागर करण्यात आला. या उपक्रमात सिद्धार्थ सावंत, प्रतीक्षा मोरे, शीतल रौंधळ, प्रज्ञा तळेकर, आरती ताटके या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

याप्रसंगी कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य प्रा.एस. एन. टाकळकर यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी, तर आभार प्रा. किशोर लांडेपाटील यांनी मानले.

Hello Pune Gramin
Page No. 9 Feb 28, 2020
Powered by: erelego.com

पुढारी

# पुस्तकांशी मैत्री करा : प्रा. वाघिरे

राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा

शिक्षण घेताना अभ्यासक्षेत्र कोणतेही असले तरी सकारात्मकता, कल्पनाशक्ती, सर्जनशीलता आणि मानवी मूल्ये समृद्धपणे अनुभवण्यासाठी विद्यार्थ्यांनी पुस्तकांशी मैत्री केली पाहिजे, असे मत कवी व पिंपरीच्या महात्मा फुले महाविद्यालयातील प्रा. विद्यासागर वाघिरे यांनी व्यक्त केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभाग व मराठी वाङ्मय मंडळ यांच्या वतीने गुरुवारी (दि. २७) जागतिक मराठी राजभाषा दिन कार्यक्रम आयोजित केला होता. या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. वाघिरे बोलत होते. हुतात्मा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. किशोर लांडे पाटील, प्रा. दिलीप मुळुक, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. मच्छिंद्र मुळुक, प्रा. शंकर गोपाळे या वेळी उपस्थित होते.

उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी वाचनसंस्कृतीच्या प्रसारासाठी प्रत्येक सूज्ञ मराठी भाषकाने प्रयत्न करायला हवेत असे सांगून मराठी भाषा फक्त अभिमानासाठी न राहता ज्ञानभाषा होण्यासाठी सरकार दरबारी प्रयत्न व्हायला हवेत असे सांगितले. मराठी विभागाच्या वतीने कुसुमाग्रज यांच्या कवितांचा जागर करण्यात आला. या उपक्रमात सिद्धार्थ सावंत, प्रतीक्षा मोरे, शीतल रौंधळ, प्रज्ञा तळेकर, आरती ताटके या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

Edition
28 Feb, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com

# विद्यार्थ्यांनो, पुस्तकांशी मैत्री करा

## प्रा. विद्यासागर वाघिरे : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी भाषा दिन उत्साहात

**राजगुरुनगर, दि. २८ (प्रतिनिधी)** - विद्यार्थ्यांचे अभ्यासक्षेत्र कोणतेही असले तरी सकारात्मकता, कल्पनाशक्ती, सर्जनशीलता आणि मानवी मूल्ये समृद्धपणे अनुभवण्यासाठी पुस्तकांशी मैत्री करण्याचे आवाहन कवी व पिंपरीच्या महात्मा फुले महाविद्यालयातील प्रा. विद्यासागर वाघिरे यांनी केले.

येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभाग व मराठी वाङ्मय मंडळ यांच्या वतीने जागतिक मराठी राजभाषा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. किशोर लांडेपाटील, प्रा. दिलीप मुळूक, डॉ. बाळासाहेब



**राजगुरुनगर : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी राजभाषा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना प्रा. विद्यासागर वाघिरे.**

अनुसे, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. शंकर गोपाळे उपस्थित होते. मराठी भाषेचा गौरव करताना प्रा. वाघिरे म्हणाले की, मराठी भाषेची परंपरा प्राचीन असून गाथासप्तपदी ग्रंथ, ताम्रपट, शिलालेखापासून तिचा प्रवास सुरू झाल्याचे सांगता येते. ज्ञानेश्वरी आणि गाथा महाराष्ट्राचा सांस्कृतिक ऐवज असून प्रत्येकाने एक तरी ओवी अनुभवायला हवी.

प्रास्ताविकात बोलताना उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी मराठी भाषा फक्त अभिमानासाठी न राहता ज्ञानभाषा होण्यासाठी सरकार दरबारी प्रयत्न व्हायला हवेत, असे सांगितले. मराठी विभागाच्या वतीने कुसुमाग्रज यांच्या कवितांचा जागर करण्यात आला. या उपक्रमात सिद्धार्थ सावंत, प्रतीक्षा मोरे, शीतल रौंधळ, प्रज्ञा तळेकर, आरती ताटके या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. याप्रसंगी कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य प्रा. एस. एन. टाकळकर यांनी केले. सूत्रसंचालन मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी तर प्रा. किशोर लांडेपाटील यांनी आभार मानले.

सकाळ

# पुस्तकांशी मैत्री करा : प्रा. वाघिरे

**राजगुरुनगर :** कल्पनाशक्ती, सर्जनशीलता आणि मानवी मूल्ये समृद्धपणे अनुभवण्यासाठी पुस्तकांशी मैत्री करण्याचे आवाहन कवी प्रा. विद्यासागर वाघिरे यांनी केले. वाघिरे हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभाग व मराठी वाङ्मय मंडळ यांच्यातर्फे जागतिक मराठी राजभाषा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य एस. एन. टाकळकर, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. शंकर गोपाळे उपस्थित होते. मराठी विभागाच्या वतीने कुसुमाग्रज यांच्या कवितांचा जागर करण्यात आला. या उपक्रमात सिद्धार्थ सावंत, प्रतीक्षा मोरे, शीतल रौंधळ, प्रज्ञा तळेकर, आरती ताटके या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी केले. प्रा. किशोर लांडे-पाटील यांनी आभार मानले.

Pune, District-Today
01/03/2020 Page No. 10

# पुस्तकांशी मैत्री करा : कवी विद्यासागर वाघिरे

**राजगुरुनगर | वार्ताहर**



विद्यार्थ्यांचे अभ्यासक्षेत्र कोणतेही असले तरी सकारात्मकता, कल्पनाशक्ती, सर्जनशीलता आणि मानवी मूल्ये समृद्धपणे अनुभवण्यासाठी पुस्तकांशी मैत्री करण्याचे आवाहन कवी व पिंपरीच्या महात्मा फुले महाविद्यालयातील प्रा. विद्यासागर वाघिरे यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभाग व मराठी वाङ्मय मंडळ यांच्या वतीने जागतिक मराठी राजभाषा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. किशोर लांडेपाटील, प्रा. दिलीप मुळूक, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. शंकर गोपाळे उपस्थित होते. मराठी भाषेचा गौरव करताना प्रा. वाघिरे म्हणाले की मराठी भाषेची परंपरा प्राचीन असून गाथासप्तपदी ग्रंथ, ताम्रपट, शिलालेखापासून तिचा प्रवास सुरू झाल्याचे सांगता येते. ज्ञानेश्वरी आणि गाथा महाराष्ट्राचा सांस्कृतिक ऐवज असून प्रत्येकाने एक तरी ओवी अनुभवायला हवी असेही ते म्हणाले. पुस्तक वाचून मिळणारा आनंद सांगताना त्यांनी शंकर पाटील आणि व्यंकटेश माडगूळकर यांच्या ग्रामीण कथांचे थेट हृदयाला जाऊन भिडणारी वर्णने विद्यार्थ्यांना ऐकवली. याप्रसंगी त्यांनी कमीत कमी शब्दात जीवनाचा अखंड अनुभव साकारणाऱ्या कुसुमाग्रज यांच्या कविता सादर केल्या. कविता जगण्याची प्रेरणा देते, जगण्याचे निमित्त देते आणि जगणे अधिक संपन्नही करते यासाठी विद्यार्थ्यांनी साहित्याशी स्नेह वाढवून आपले व्यक्तिमत्व अधिक प्रभावी करावे असे त्यांनी सांगितले.

# पुस्तकांशी मैत्री करा : कवी विद्यासागर वाघिरे



राजगुरुनगर : विद्यार्थ्यांचे अभ्यासक्षेत्र कोणतेही असले तरी सकारात्मकता, कल्पनाशक्ती, सर्जनशीलता आणि मानवी मूल्ये समृद्धपणे अनुभवण्यासाठी पुस्तकांशी मैत्री करण्याचे आवाहन कवी व पिंपरीच्या महात्मा फुले महाविद्यालयातील प्रा. विद्यासागर वाघिरे यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभाग व मराठी वाङ्मय मंडळ यांच्या वतीने जागतिक मराठी राजभाषा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. किशोर लांडेपाटील, प्रा. दिलीप मुळूक, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. शंकर गोपाळे उपस्थित होते.

मराठी भाषेचा गौरव करताना प्रा. वाघिरे म्हणाले की मराठी भाषेची परंपरा प्राचीन असून गाथासप्तपदी ग्रंथ, ताम्रपट, शिलालेखापासून तिचा प्रवास सुरू झाल्याचे सांगता येते. ज्ञानेश्वरी आणि गाथा महाराष्ट्राचा सांस्कृतिक ऐवज असून प्रत्येकाने एक तरी ओवी अनुभवायला हवी असेही ते म्हणाले. पुस्तक वाचून मिळणारा आनंद सांगताना त्यांनी शंकर पाटील आणि व्यंकटेश माडगूळकर यांच्या ग्रामीण कथांचे थेट हृदयाला जाऊन भिडणारी वर्णने विद्यार्थ्यांना ऐकवली. याप्रसंगी त्यांनी कमीत कमी शब्दात जीवनाचा अखंड अनुभव साकारणाऱ्या कुसुमाग्रज यांच्या कविता सादर केल्या. कविता जगण्याची प्रेरणा देते, जगण्याचे निमित्त देते आणि जगणे अधिक संपन्नही करते यासाठी विद्यार्थ्यांनी साहित्याशी स्नेह वाढवून आपले व्यक्तिमत्व अधिक प्रभावी करावे असे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात बोलताना उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी वाचनसंस्कृतीच्या प्रसारासाठी प्रत्येक सूज्ञ मराठी भाषकाने प्रयत्न करायला हवेत असे सांगून मराठी भाषा फक्त अभिमानासाठी न राहता ज्ञानभाषा होण्यासाठी सरकार दरबारी प्रयत्न व्हायला हवेत असे सांगितले. मातृभाषेशी असलेले आपले नाते हे नेमके काय स्वरूपाचे असते हे प्रत्येकाने समजावून घेऊन मराठी भाषेचा अंतर्नाद ऐकू येण्यासाठी भाषा व वाङ्मयीनदृष्ट्या विद्यार्थ्यांनी समर्थ होण्याचे आवाहन केले. मराठी विभागाच्या वतीने कुसुमाग्रज यांच्या कवितांचा जागर करण्यात आला. या उपक्रमात सिध्दार्थ सावंत, प्रतीक्षा मोरे, शितल रौंधळ, प्रज्ञा तळेकर, आरती ताटके या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या प्रसंगी कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य प्रा.एस. एन. टाकळकर यांनी केले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख